# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**सांगली जिल्ह्यातील राजेवाडी उजवा कालव्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१) ११०८ (२२-१२-२०१४). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील राजेवाडी उजवा कालव्याचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालव्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, सांगली यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,च वरील कालव्याचे काम प्रलंबित रहाण्याची कारणे काय आहेत व ते तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(४) या कालव्याच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१५)** :(१) होय.

(२) होय.

(३) म्हसवड (राजेवाडी) उजवा कालवा १ ते ८.६० किमी या प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रु. ११.८८ लक्ष इतकी होती व सन १९९४ -९५ पर्यंत सदर प्रकल्पावर रु. १८.३२ लक्ष रु.४.०९ लक्ष रोहयो अंतर्गत व रु १४.२३ लक्ष निविदेवर) खर्च झाला आहे.

त्यानुसार शासनाने प्रकल्पावरील झालेला खर्च रु १८.३२ लक्षसह प्रकल्पाच्या आहे त्या स्थितीत अंतीम करुन उर्वरित कामासाठी प्रकल्पाची नव्याने तपासणी करुन प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्याबाबत शासनाने दिनांक ०१.०७.२०१३ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) शासनाच्या दिनांक ०१.०७.२०१३ च्या पत्रातील सुचनेनुसार नियामक मंडळाच्या ८३ व्या बैठकीमध्ये ठराव क्र. ८३/८ नुसार प्रकल्पावरील झालेला अद्यावत खर्च रु. १८.३२ लक्षसह प्रकल्पाच्या आहे त्या स्थितीत अंतीम करणेबाबत शासनास शिफारस करुन उर्वरित काम

नवीन काम म्हणून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावीत करण्यास महामंडळास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार प्रकल्पावर अद्यावत खर्चास प्रकल्पाच्या आहे त्या स्थितीत अंतीम करणेबाबतच्या प्रस्तावावर व उर्वरित कामांकरीता प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही महामंडळ स्तरावरुन करण्यात येत आहे.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथील पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाकरीता उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२) १७०१० (१७-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथील पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाकरीता उर्वरित निधी उपलबध करुन देण्याकरीता मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वित्त व नियोजन मंत्री, मा.ग्रामविकास व जलसंवर्धन मंत्री व प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण यांना दिनांक ६ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनसाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) होय.

(२) पंचायत समिती इमारत बांधकामासाठी योजनेअंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा परिषदेला निधी वितरीत केला जातो.

अमरावती जिल्हा परिषदेच्या मागणीनुसार मोजमाप पुस्तीकेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार नांदगाव खांडेश्वर पंचायत समिती इमारत बांधकामासाठी रु. ९०.०० लक्ष इतका निधी शासन निर्णय दिनांक २९ ऑगस्ट, २०१५ अन्वये वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खुलताबाद तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत लाभार्थी शेतकऱ्यांच्या विहिरी मंजूर करण्याबाबत**

**(३) १७२०२ (१४-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने खुलताबाद तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत सन २०१० मध्ये विविध गावातील ६९ विहिरी मंजूर करण्यात आल्या होत्या परंतु अधिका-यांचे दुर्लक्ष व कर्मचा-यांचा वेळ काढूपणा यामुळे मंजूर ३२ विहिरीचे प्रस्ताव रद्द करण्यात आलेले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भ्रष्ट कर्मचारी यांच्यामुळे रद्द झालेल्या गरीब लाभार्थी शेतक-यांच्या विहिरी पुन्हा मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-१०-२०१५) :**(१) नाही.
गट विकाय अधिकारी, पंचायत समिती खुलाताबाद यांनी ६९ सिंचन विहिर सन २०१० मध्ये मंजूर केलेल्या नसून सन २०११-१२ मध्ये मंजूर केलेल्या आहेत. त्यापैकी ३४ विहिरी पूर्ण झालेल्या असून ३ विहिरी प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ३२ सिंचन विहिरी लाभार्थ्यांनी ग्रामपंचायतीकडे कामाची मागणी न केल्यामुळे सुरु झालेल्या नाहीत. शासन परिपत्रक दिनांक ७ मार्च, २०१५ अन्वये दिनांक १ ऑगस्ट, २०१२ पूर्वी मंजूर झालेल्या तथापि आजतागायत सुरु न झालेल्या विहिरी रद्द करण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार उर्वरित विहिरी रद्द करण्यात आलेल्या आहेत.
(२) शासन परिपत्रक दिनांक ७ मार्च, २०१५ मधील सूचनांनूसार ज्या लाभार्थ्यांना विहिरी रद्द झालेल्या आहेत असे लाभार्थी नरेगा अंतर्गत पुनश्च अर्ज करु शकतात व ते पात्र असल्यास त्यांना महात्मा गांधी नरेगा अंतर्गत विहिरीचा लाभ देण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील ग्रामपंचायत 'कार्यसिध्दी' प्रोत्साहन योजनेचा निधी मिळविण्यास अकार्यक्षम असल्याबाबत**

**(४) १७४७० (१७-०८-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील एकाही ग्रामपंचायतीने सामाजिक लेखा परिक्षण करुन घेतले नाही, तसेच ग्रामसभा व मासिक बैठकीचा वृत्तांत ऑनलाईन न केल्यामुळे 'कार्यसिध्दी' प्रोत्साहन योजनेचा निधी मिळविण्यास एकही ग्रामपंचायत पात्र ठरली नाही. सामाजिक लेखा परिक्षण व बैठक प्रबंधामध्ये योजना अडकल्याने सव्वा कोटीचा निधी परत करण्याची नामुष्की जिल्हा परिषदेवर आली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदर जिल्हा विकास यंत्रणेला शासनाने मार्गदर्शन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी शासनाकडून मागास क्षेत्र अनुदान निधी अंतर्गत येणाऱ्या १२ जिल्हा परिषदांना पत्र देण्यात आले होते. त्यामध्ये मुद्दा क्रमांक २ मध्ये नमूद करण्यात आले होते की, ज्या आर्थिक वर्षामध्ये एकही ग्राम पंचायत कार्यसिध्दी प्रोत्साहन निधी निकषामध्ये पात्र नसेल तर त्या वर्षासाठी १०% निधी कार्यसिध्द प्रोत्साहन अंतर्गत राखीव ठेवण्यात येवू नये.

तसेच २०/०४/२०१५ रोजी शासनाने मागास क्षेत्र अनुदान निधी या योजनेअंतर्गत येणाऱ्या १२ जिल्ह्यांना सद्य:स्थितीत चालु कामे दिनांक ३१ मे, २०१५ पुर्वी पूर्ण करणे व चालू न केलेली कामे तात्काळ रद्द करणे असे मार्गदर्शन केले होते.

तसेच दिनांक ३० मे, २०१५ च्या पत्रान्वये, सदरची योजना बंद करण्याबाबत उच्च अधिकारी समितीची बैठक दिनांक २२ मे, २०१५६ चे इतिवृत्त मागास क्षेत्र अनुदान निधी अंतर्गत असणाऱ्या १२ जिल्ह्यांना पाठविण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्ह्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या दुसऱ्या भागात २० रस्त्यांना मंजूरी देण्याबाबत**

**(५) १८५६१ (१७-०९-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या दुस-या भागात २० रस्त्यांना मंजूरी माहे मार्च, २०१५ मध्ये मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या कामासाठी ५२ कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्यांच्या कामासाठी मंजूर झालेल्या निधी अद्याप मिळाला नसल्याने एकही रस्त्याची कामे सुरु झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी मिळाल्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) व (२) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील १७ रस्ते व ३ पुल अशी रु.५३.८८ कोटी किंमतीची २० कामे केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना भाग-२ अंतर्गत फेब्रुवारी व मे, २०१४ मध्ये मंजूर केलेली आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

सदर कामांपेकी वाडात्तर टेंबवली ताम्हाणनगर रस्ता हे काम CRZ मंजूरी अभावी सुरु करण्यात आले नसून इतर सर्व कामे सुरु आहेत.

(४) सदर प्रश्नांच्या भाग (१) मध्ये नमूद कामांसाठी शासनाने रु. १२०.३० लख इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपळगांव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) येथील टोल प्लाझाने केलेले अनधिकृत बांधकाम**

**(६) १९१८१ (१४-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळगांव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) येथील टोल प्लाझाने ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५२ नुसार बांधकाम करताना ग्रामपंचायतीची परवानगी घेणे बंधनकारक असतांना सदर परवानगी न घेता अनधिकृत बांधकाम केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, सदर टोल प्लाझा कंपनीने किती क्षेत्रावर अनधिकृत बांधकाम केलेले आहे व सदर अनधिकृत बांधकाम काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१), (२) व (३) भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरण यांच्या प्रोजेक्ट इम्प्लिमेन्टेशन युनिट, नाशिक मार्फत मुंबई-आग्रा रोड या राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील पिंपळगाव व नाशिक गोंदे या भागाच्या सहापदरीकरणाच्या कामाच्या दरम्यान पिंपळगाव बसवंत ग्रामपंचायतीची पूर्व परवानगी न घेता सन २०११ मध्ये ग्रामपंचायत हद्दीत टोल प्लाझा कंपनीने बांधकाम केले होते.

या प्रकरणाच्या चौकशीमध्ये ग्रामपंचायतीच्या मालकीच्या सर्व्हे क्र.४८३ च्या जागेमध्ये ग्रामपंचायतीच्या पनवानगीशिवाय टोल प्लाझाने बांधकाम केल्याचे आढळून आल्यामुळे ग्रामपंचायतीने राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या प्रोजेक्ट इम्प्लिमेन्टेशन युनिट यांना दि.०१.०१.२०१४ व दि.२६.११.२०१४ रोजी नोटीस दिली होती.

सदर नोटीशीला भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने दि.१२ डिसेंबर, २०१४ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीनुसार पिंपळगाव बसवंत टोल प्लाझाचे बांधकाम झालेल्या ग्रामपंचायतीच्य सर्व्हे क्र.४८३ मधील ५३०० चौरस फूटांच्या परिसरची जागा केंद्र शासनाकडे वर्ग झाली असल्याचे केंद्र शासनाच्या का.आ.१४२५ (अ) दि.१४.०६.२०१० च्या अधिसूचनेमध्ये नमूद केले आहे.

त्यानुसर ही जमीन भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरणाच्या नावे झालेली असून टोल प्लाझा ही इमारत केंद्र शासनाची प्रकल्पांतर्गत मालमत्ता असल्यामुळे व आता ही जागा सक्षम प्राधिकारी, सडक परिवहन व राजमार्ग परिवहन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या नावे झालेली असल्यामुळे तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५२

मधील तरतूदीनुसार शासकीय प्रयोजनासाठी वापरण्यात येणा-या इमारतींसाठी बांधकाम परवानगीची आवश्यकता नसल्यामुळे टोल प्लाझा कंपनीवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

**सौर दिप योजने अंतर्गत एजन्सी निश्चित करतांना योग्य प्रक्रिया न राबवली गेल्यामुळे सदर योजनेतील कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(७) १९१८८ (१४-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केद्र शासनाच्या ४०% राज्य शासनाच्या ४०% व ग्रामपंचायतीच्या २०% अनुदानातून सौर दिप लावण्याच्या योजनेतील कामे करण्यासाठी राज्य पातळीवरुन एजन्सी निश्चित केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) सौर दिप योजने अंतर्गत एजन्सी निश्चित करतांना योग्य प्रक्रिया न राबवली गेल्या मुळे सदर योजनेतील कामे मोठया प्रमाणावर प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीतांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१)होय.
सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी दिनांक ०४.०३.२०१४ च्या शासन निर्णयान्वये महाऊर्जाच्या सन २०१३-१४ च्या दरपत्रकास समावेश असलेल्या संस्थांची जिल्हानिहाय निवड करण्यात आलेली होती.
(२) नाही.
तथापि, सन २०१३ या वर्षासाठी केंद्र हिस्सा निधी मागणी करीता महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण मार्फत पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजूरी प्राप्त न झाल्यामुळे याप्रकरणी पुढील कार्यवाही होवू शकली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील अनेक ग्रामपंचायतीत डाटा इंन्ट्री न करताही सदर संस्थेला कर्मचाऱ्यांच्या पगाराची बिले अदा करण्यात आल्याबाबत**

**(८) १९१९० (१७-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हापरिषदे अंतर्गत १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार ग्रामपंचायतीला दिल्या जाणाऱ्या निधीतून महाऑनलाइन कंपनीला ग्रामपंचायतींना कॉम्पुटर ऑपरेटर कर्मचारी

पुरवण्याचा ठेका दिलेला असुन सदर कर्मचाऱ्यांना कंपनीकडून प्रति कर्मचारी ४०००/- प्रति महिना पगार दिला जात असुन ठेकेदार शासनाकडून प्रति कर्मचारी ९०००/- प्रति महिना या प्रमाणे बील आकारणी करीत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीत डाटा इंन्ट्री न करताही सदर संस्थेला कर्मचाऱ्यांच्या पगाराची रक्कम बिले अदा करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास,त्यानुसार संबंधीतांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) ग्रामपंचायतीकडून महाऑनलाईनला तांत्रिक मनुष्यबळ, तंत्रज्ञान सहाय्य यासाठी डिसेंबर, २०१४ पर्यंत ८०००/- + सेवा कर इतका मोबदला अदा करण्यात येत होता. यामध्ये संगणक परिचालकांच्या मोबदला, कागद, टोनर इ. कंझ्युमेबल्स प्रशिक्षण, बैठका, वेबसाईट व अनुषंगिक सॉफ्टवेअर बनविणे इ. खर्चाच्या सर्व बाबी अंतर्भुत होत्या., तथापि, जानेवारी २०१५ पासुन संगणक परिचालकाला रु.४५००/- + सेवा कर व महाऑनलाईनने संगणक परिचालक उपलब्ध करुन दिल्यास तांत्रिक मनुष्यबळ व तंत्रज्ञान सहाय्य पोटी रु. २२००/- + सेवा कर मोबदला दिला जातो.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्वच जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडे**
**अनेक कामाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(९) १९३५० (१७-०८-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडे अनेक कामाचे प्रस्ताव प्रलंबित असतानासुद्धा सदर कामाना निधी उपलब्ध करुन न देता जिल्हा नियोजन समित्यांकडे सुमारे दोन हजार कोटींचा निधी पडून असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले व त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच ठाणे जिल्हानिहाय समितीकडे माहे मार्च, २०१५ अखेर किती निधी शिल्लक होता व कोणत्या विभागाचा होता तसेच ज्या विभागाचा निधी शिल्लक होता त्या विभागाचे किती प्रस्ताव प्रलंबित ठेवले आहेत व प्रस्ताव आले नसल्यास, सदर विभागास सुचित केले होते का,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) ठाणे जिल्ह्यास जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१४-१५ करिता मंजूर रु. ३००.०० कोटी इतका नियतव्यय अर्थसंकल्पीत करण्यात आला होता व तो जिल्ह्यास पूर्णपणे वितरीत करण्यात आला होता. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील प्राप्त माहितीनुसार ठाणे जिल्ह्याने सदर निधी कार्यान्वयन यंत्रणांना पूर्ण पणे वितरीत केला आहे. मार्च, २०१५ अखेरीस कोणत्याही विभागाचा निधी जिल्हा नियोजन समितीमध्ये शिल्लक नाही. तसेच कोणत्याही विभागाचे प्रस्ताव प्रलंबित नाहीत.
(४) ते (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालुक ते पन्हेळी रस्ता डांबरीकरणाबाबत**

**(१०) १९६२६ (१४-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) “मालुक ते पन्हेळी रस्ता डांबरीकरण करणेबाबत” या विषयावरील दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजीचे निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे,
(२) वानस्ते-पन्हेळी-ढोरजे-कुडतुडी ते म्हसळा हा रस्ता रस्ते विकास योजनेनुसार इतर जिल्हा मार्ग क्र. १२७ असून प्रश्नांकित मालुक ते पन्हळी हा सदर रस्त्यांचा भाग आहे. या भाग रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे काम सन २०१५-१६ अंतर्गत रस्ते व पुल दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हापरिषदेतील प्राथमिक शिक्षकांचा बंद केलेला**
**घरभाडे भत्ता पूर्ववत सुरु करण्याची केलेली मागणी**

**(११) १९७३७ (०६-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हापरिषदेतील प्राथमिक शिक्षकांचा बंद केलेला घरभाडे भत्ता पूर्ववत सुरु करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषदेने वारंवार मंत्री महोदय व संबंधित अधिकाऱ्यांकडे करुनही अद्यापपर्यंत या संदर्भात शासनाने निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात निर्णय घेण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) उक्त प्रकरणी त्वरीत निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केंव्हापासून करणे अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-१०-२०१५)** :(१), (२) व (३) राज्यातील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून ग्रामीण जनतेपर्यंत सर्व विकास योजना परिणामकारकरित्या पोहोचणे आवश्यक असून या दृष्टीकोनातून कार्यरत जिल्हा परिषदेचा कर्मचारीवृंद मुख्यालयी वास्तव्य करणे आवश्यक आहे. या संदर्भात विधी मंडळाच्या पंचायत राज समितीद्वारा गाव पातळीवरील कर्मचारीवृंद मुख्यालयी राहण्याबाबत शासनास वेळोवेळी शिफारस करण्यात आलेली आहे व सदरहू शिफारसी विचारात घेऊनच या कर्मचारीवृंदाने त्यांच्या कामाच्या मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्यात आलेले आहे व जे कर्मचारी या आदेशाचे पालन करीत नाहीत त्यांचा घरभाडे भत्ता रोखण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

शासनाने प्रस्तुत निदेश पंचायत राज समिती या विधी मंडळ समितीने दिलेल्या सूचनांनुसार निर्गमित केलेले असून या आदेशाची अंमलबजावणी होणे अत्यंत जरुरीचे असल्याने जिल्हा परिषद कर्मचारी संघटनांकडून यासंदर्भात केलेली मागणी नाकारण्यात आलेली आहे.

---

**लोणार (जि.बुलढाणा) येथील पंचायत समितीमध्ये अभियंता, विशेष कार्यकारी अधिकारी तसेच तांत्रिक अधिकारी इत्यादी पदे रिक्त असल्याबाबत**

**(१२) १९७८० (१७-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार, जि.बुलढाणा येथील पंचायत समितीमध्ये अभियंता, विशेष कार्यकारी अधिकारी तसेच तांत्रिक अधिकारी इत्यादी पदे रिक्त असल्याने रोजगार हमीचे कामे बंद पडल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे मजूरांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात तसेच रोजगार हमीचे काम पुन्हा सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५)** :(१) व (२) हे खरे नाही. माहे मे, २०१५ अखेर पंचायतसमिती लोणार अंतर्गतच्या ग्रामपंचायत स्तरावर ३८६ कामे सुरु होती. त्यावर दैनिक मंजूर उपस्थिती १८९० इतकी होती. त्यातील अकुशल कामावर रु. ७७,९६,३१९/- इतका व कुशल कामावर रु. १८,२०,९३०/- इतका खर्च माहे मे, २०१५ मध्ये करण्यात आलेला आहे. माहे मे, २०१५ मध्ये रोहयाची कामे बंद झाल्याने मजूरांवर उपासमारीची वेळ आल्याबाबतची एकही तक्रार नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांनी कळविले आहे.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत पंचायत समिती स्तरावर अभियंत्याचे पद मंजूर नाही. मात्र पंचायत समितीतील २ अभियंत्यांकडून सदरचे काम

अतिरिक्त स्वरुपात करुन घेण्यात येत आहे. नियोजन विभागाच्या दि. २४.०७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये विशेष कार्यक्रम अधिकार मग्राराहयो या पदांऐवजी जिल्हा परिषद आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता व कृषी अधिकारी (पंचायत समिती) या संवर्गातून विशेष तांत्रिक अधिकारी (मनांराग्रारोहयो) यांची ९६ पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यामध्ये लोणार येथील पदाचाही समावेश असून सदर पदावर नियुक्ती करण्याची कार्यवाही ग्राम विकास विभागाकडून सुरु आहे. कंत्राटी तत्वावर ३ तांत्रिक अधिकारी तहसिल व पंचायत समितीस्तरावर कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलादपूर तालुक्यातील (जि.रायगड) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत**
**कापडे ते कामथे रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१३) १९८२५ (१७-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलादपूर तालुक्यातील (जि.रायगड) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत कापडे ते कामथे रस्त्याचे काम ३ वर्षापूर्वीच पूर्ण झाल्यानंतर पहिल्याच पावसाळ्यात रस्त्याची दुरावस्था झाली असल्याने त्याची दुरुस्ती ठेकेदारांच्या अनामत रक्कमेतून करण्याची नोटीस ठेकेदाराला माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नोटीसाप्रमाणे संबधित ठेकेदारांकडून सदरचे दुरुस्तीचे काम करुन घेण्यात आले आहे काय,
(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) कापडे ते कामथे रस्ता सुधारणा करणे ता.पेलादपूर हे काम दिनांक २६.१२.२०१० रोजी पूर्ण झाले असून सदर रस्त्याची पहिल्याच पावसाळ्यात दुरावस्था झालेली नाही चालू वर्षात सदर रस्त्याची नियमित देखभाल दुरुस्ती करणेबाबत संबंधित ठेकेदारास माहे मार्च, २०१५ मध्ये नोटीस देण्यात आली होती.
(२) व (३) माहे मे, २०१५ मध्ये नियमित देखभाल दुरुस्तीचे काम ठेकेदार यांचेकडून करुन घेण्यात आले आहे.

---

**उरण तालुक्यातील (जि.रायगड) नाल्यातील व गटारातील गाळ काढण्याबाबत**

**(१४) १९८४३ (१७-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) नाल्यातील व गटारातील गाळ केरकचरा काढण्याच्या कामांना सिडको उरण पंचायत समिती व त्या त्या भागातील ग्रामपंचायतीने माहे मे, २०१५ वा त्यादम्यान सुरुवात केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे यंदाच्या पावसाळ्यात तालुक्यातील गावे पाण्याखाली जाण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गाळ केरकचरा काढण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) होय हे अंशत: खरे आहे.
उरण तालुक्यातील पंचायत समिती कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतीने नाल्यातील व गटारातील गाळ काढण्याबाबत वेळोवेळी कार्यवाही केली आहे. परंतु सिडकोच्या कार्यक्षेत्रात अनधिकृत घरे बांधलेली असल्याने तसेच सिडकोच्या होल्डींग पॉईंटच्या पाईपना झाकणे नसल्याने गावातील पाणी शिरले होते. त्यानंतर सिडको हद्दीतल नाले व गटारातील गाळ व केरकचरा काढण्यात आला आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतीमध्ये नाल्यातील व गटरातील गाळ, केरकचरा, घरकचरा काढणेची, नाले साफ सफाईचे दृष्टीने ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक यांना मासिक, पाक्षिक सभेमध्ये सूचना देऊन आढावा घेण्यात येत आहे. तसेच सिडको हद्दीतील होल्डीग पाईपना झाकणे बसविण्याबाबत ग्रामपंचायतीमार्फत सिडकोस कळविण्यात आले आहे.
(४) अशी बाब नाही.

---

### राज्य शासनाकडून दिल्या जाणा-या निधीच्या विनीयोगबाबत कॅगचा अहवाल

**(१५) १९९०८ (१४-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाकडून दिल्या जाणा-या निधीचा विनीयोग अथवा कामे पुर्ण झाल्याची प्रमाणपत्र सादर करण्यात आलेली नसून जवळपास ६८ हजार कोटींची कामे पुर्ण झालेली नसल्याचे कॅगच्या अहवालात दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२ ते सन २०१४ या दोन वर्षांच्या कालावधीत किती कोटीची कामे पुर्ण झालेली आहेत,
(३) नसल्यास, सदर कामांची नोंद व निधी खर्च झाल्याची प्रमाणपत्रे सादर करण्यात आली आहेत काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०९-२०१५) :**(१) ते (४) *भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१४ रोजी संपलेल्या वर्षातील राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालातील परिच्छेद ३.१ व ३.९ नुसार अनुदानित सस्थांना दिलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्याबद्दल निरीक्षण नोंदविलेले आहे. संबंधित संस्थेत प्रामुख्याने स्थानिक

स्वराज्य संस्था, सहकारी संस्था व अनुदानित शैक्षणिक संस्थांचा अंतर्भाव आहे. अशा संस्थेस सर्वसामान्यपणे खर्च करण्याची व ह्या संस्थेचे लेखापरीक्षणाची पध्दत विहीत केली आहे. अनुदान अखर्चित पडून असल्यास त्या संबंधी विहीत कालावधी नंतर त्या संस्थेच्या लेखा परिक्षण अहवालामध्ये नोंद घेण्याची पध्दत आहे.

* दरवर्षी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या राज्याच्या वित्त व्यवस्थेवरील अहवालात उपयोगिता प्रमाणपत्राविषयी माहिती समाविष्ट असते. त्यानुषंगाने वित्त विभागामार्फत आढावा घेतला जातो.

* प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र व खर्च व जमा ताळेबंद यांचा आढावा घेण्यासाठी सन २०१३ मध्ये मा.मुख्य सचिवांकडे सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांच्या उपस्थितीत वरील विषयासंदर्भात आढावा घेण्यात आला. त्यावेळेस प्रधान महालेखापाला (ले. व ह.) महाराष्ट्र-१ या स्वत: उपस्थित होत्या. याबाबतच्या दि. २५.४.२०१३ व दि. २८.५.२०१३ इत्यादी बैठका मा.मुख्य सचिवांच्या दालनामध्ये घेण्यात आल्या.

* मा.मुख्य सचिव यांचेकडील सचिव समन्वय समितीमधेही सन २०१४-१५ मध्ये दि.२५ मार्च, २०१५ , दि.८ एप्रिल, २०१५ दि. १३ जुलै, २०१५ व दि. १२ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या बैठकीत याविषयाची आढावा घेण्यात आला.

* मा.मुख्य सचिव यांनी दिलेल्या निर्देशनुसार वित्त विभागाच्या सचिव स्तरावर सदर प्रलंबितता कमी करण्यासाठी दर महिन्याला मंत्रालयीन विभागांनी नियुक्त केलेल्या नोडल अधिकाऱ्यांसमावेत बैठक घेण्यात येते.

* सदर प्रलंबितता कमी करण्यासाठी वित्त विभागाने परिपत्रक क्र.मआय-२०१४/प्र.क्र.४२/विनियम, दि.९.१०.२०१४ अन्वये प्रशासकीय विभागांना निर्देश दिलेले आहेत.

* मा.मंत्री (वित्त) यांच्या स्तरावर दि. २३.०७.२०१५ रोजी सर्व कॅबिनेट मंत्र्यांना सदर प्रलंबितता कमी करण्याच्या अनुषंगाने प्रशासकीय विभागांना सूचना देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच दि. ७.८.२०१५ रोजी अपर मुख्य सचिव यांच्या स्तरावर अर्धशासकीय पत्राद्वारे उपयोगिता प्रमाणपत्रे व संक्षिप्त देयकांचा निपटारा करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

* प्रधान सचिव (वि.सु.) यांच्या स्तरावर दि. १९.०८.२०१५ च्या अर्धशासकीय पत्राद्वारे विहीत कालावधीत तपशिलावर देयके/उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत प्रशासकीय विभागास सूचना देण्यात आलेल्या आहेत.

याप्रमाणे वित्त विभागातर्फे नियमित कार्यवाही करण्यात येत आहे.

* महालेखापाल/अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कॅगच्या अहवालात नमूद दि. ३१.३.२०१४ पर्यंतच्या रु. ६८ हजार कोटीच्या प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रापैकी, विविध विभागांकडून माहे जून २०१५ पर्यंत सुमारे रु.४३.६ हजार कोटी रकमेची प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात आलेली आहेत.

---

**पारोळा तालुक्यातील (जि.जळगावं) धुळपिंप्री ग्रामपंचायतीच्या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद जळगांव यांचेकडून १३ व्या वित्त आयोगातून ग्रामविकासाकरिता अदा करण्यात आलेल्या रक्कमेबाबत**

**(१६) १९९६६ (१४-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा तालुक्यातील (जि.जळगावं) धुळपिंप्री ग्रामपंचायतीच्या सन २०१३-१४, २०१४-१५ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद जळगांव यांचेकडून १३ व्या वित्त आयोगातून ग्रामविकासाकरिता अदा करण्यात आलेल्या रक्कमेत गावात काही एक काम न करता सरंपच व त्यांचे पती यांनी ग्रामसेवकांच्या संगनमताने सदर रक्कम गिळंकृत केल्याची नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले हे खरे आह काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) नाही. पारोळा तालुकयातील (जि.जळगांव) धुळपिंप्री ग्रामपंचायतीच्या सन २०१३-१४ व २०१४-१५६ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद, जळगांव यांच्याकडून १३ व्या वित्त आयोगातून प्राप्त रकमेतून ग्रामपंचायतीचे ठरावाने गटार, रस्ते, पाणीपुरवठा इ. कामे घेण्यात आलेली आहेत. शाखा अभियंता यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार कामे पूर्ण करुन मोजमाप पुस्तिकेत नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. मूल्यांकनाप्रमाणे खर्चाचे प्रमाणात कामे झालेली आहेत. त्यामुळे सरपंच व त्यांचे पती ग्रामसेवकाच्या संगनमताने सदर रक्कम गिळंकृत केल्याचे दिसून येत नाही.

(२) श्री.रमेश शांताराम पाटी रा.धुळपिंप्री यांनी मा.उपाध्यक्ष जि.प.जळगांव यांच्याकडे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचायत समिती स्तरावरुप सखोल चौकशी करण्यात आलेली आहे.

(३) चौकशीअंती ग्रामपंचायत स्तरावर साहित्य खरेदी करतांना दरपत्रक न मागविणे, धनादेशाद्वारे रकमा प्रदन न करणे इ. तांत्रिक स्वरुपाच्या अनियमितता केल्याचे दिसून येते.

(४) संबंधित ग्रामपंचायतीचे सचिव यांना कारवाईबाबत नोटीस देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आराठी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीत अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(१७) २०११९ (१७-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आराठी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) या ग्रामपंचायत हद्दीत अजवा पार्क ही वाणिज्य इमारत अकृषीक परवानगी नसताना अनधिकृत बांधकाम करणेत येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीला अकृषिक परवानगी ग्रामपंचायतीने कोणत्या नियमाचे अधारे वाणिज्य इमारत बांधकामास परवानगी देण्यात आली,
(३) आराठी परिसरात सातत्याने अनधिकृत बांधकामात वाढ होत असून या कामांसाठी पर्यावरण विभागाची परवानगी घेण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, अनधिकृतपणे बांधकाम करणा-यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) नाही.

ग्रामपंचायत आराठी हद्दीत पार्क या नावाने इमारत बांधकाम परवानगी अर्ज नसून ग्रामपंचायत आराठीने आजवा पार्क या नावानेइमारत बांधकाम परवानगी दिलेली नाही.

परंतु ग्रामपंचायत आराठीकडे मासिक सभा दिनांक २९.११.२०१४ ठराव क्रमांक ५४ (६) अन्वये गट क्र. ८१अ क्षेत्र ०-२७-० या जमिनीमध्ये मा.जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांची पुर्व परवानगी घेऊन इमारतीचे बांधकाम करणेबाबत ग्रामपंचायत आराठीचे बांधकाम परवाना दिलेला आहे.

(२) ग्रामपंचायत आराठीकडे श्रीमती शाहीन सज्जाद काळोखे व श्रीमती नसीमा शहेबाज काळोखे यांचा दिनांक २९.११.२०१४ रोजी गट नं. ८१-अ क्षेत्र ०-२७-० या जमिनीमध्ये ६५X४५ या G+२ प्रमाणे इमारत बांधण्याची परवानगी मागितली असता सदर परवानगी अर्जासोबत ७/१२ उतारा, प्लॅन, नकाशा कागदपत्र जोडलेली आहेत. बिनशेती करण्यासाठी संबंधित यंत्रणेकडे केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत जोडलेली आहे तसेच आरोग्य विभागाचा दाखला जोडण्यात आला आहे.

सदर अर्जावर सभेमध्ये चर्चा करण्यात आली असता, सचिवाचे मते सदरची G+२ इमारत बांधण्यापूर्वी त्यांनी जागेची बिनशेती परवानगी व जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील टाऊनप्लॉनिंग इत्यादी परवानगी असल्याशिवाय काम सुरु करता यणार नाही असे सुचित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराने आवश्यकत्या संबंधित यंत्रणेकडे याबाबत पत्रव्यवहार केला असल्यामुळे त्यांना ग्रामपंचायत आराठी मासिक सभा दिनांक २९.११.२०१४ ठराव क्र.५४(६) अन्वये गट नं.८१अ क्षेत्र ०-२७-० या जमिनीमध्ये G+२ बांधकाम परवानगी देण्याबाबत एकमताने ठराव केलेला आहे.

(३) आराठी हद्दीत पर्यावरण विभागाची परवानगी न घेता बांधकाम सुरू केलेल्या इमारत बांधकामांना आराठी ग्रामपंचायतीने बांध्काम थांबविणेच्या नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.
(४) गट नं ८१-अ क्षेत्र ०-२७-० या जमिनीमध्ये इमारतीचे बांधकाम सुरु केलेले होते. सदर बांधकाम थांबविण्यासाठी सरपंच, ग्रामपंचायत आराठी पंचायतीने जा.क्र.१००५/२०१५ दिनांक ०७.०३.२०१५ रोजी नोटीस बजावणेत आली आहे व सदर इमारत बांधकाम सद्य:स्थितीत बंद असल्याचे निदर्शनास आले आहे.
(५) अशी बाब नाही.

---

## बीड जिल्हा परिषदेमध्ये संगणक खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(१८) २०१४३ (१४-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेमध्ये संगणक खरेदीमध्ये ६८ लाख रुपयाचा झालेला गैरव्यवहार तसेच अनेक कामात बेकायदेशीर दिलेली प्रशासकीय मान्यता व अन्य गैरकारभार केल्याबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव जवळेकर यांना निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हा परिषदेच्या गैरकारभाराची विभागीय अप्पर आयुक्त, औरंगाबाद यांच्या पथकाने चौकशी करुन सुमारे १५ अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी सुरु झाली आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव जवळेकर यांच्या व्यतिरिक्त अन्य किती अधिकाऱ्यांवर कारवाई केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१५) :**(१) बीड जिल्ह्यात परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर कार्यरत असताना श्री. जवळेकर यांनी केलेल्या अनियमिततेसंदर्भात त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

(२) १५ अधिकाऱ्यापैकी श्री.हिप्पाळे एस.एम., तत्का, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) हे मयत झालेले आहेत. उर्वरित १४ अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

(३) श्री.राजीव जवळेकर यांच्याव्यतिरिक्त श्री. वसंत जाधवर, तत्का, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, श्री.आर.बी. लिंगणवाड, प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, श्री.आर.बी. साळवी, प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना शासन आदेश क्र.विभाचौ/१०१४/प्र.क्र.३६/कोषा-१, दिनांक २२ जुलै, २०१५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गटविकास अधिकारी मुरबाड (जि.ठाणे) यांच्या गैरकारभाराबाबत

**(१९) २०१४५ (१४-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांचेकडे तालुक्यातील घरकुल, शौचालये, पाणी पुरवठा, जनसुविधा योजनांतील गैरव्यवहार, आरोग्य, शाळांची दुरावस्था ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक यांचा गैरकारभाराबाबत ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांचेकडे लेखी तक्रार दाखल केली अाहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुरबाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, सरपंच व ग्रामसेवक यांचे विरुध्द तक्रार दाखल होवूनही कोणतीही कार्यवाही केली जात नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सरळगाव ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी गैरकारभाराबाबत अनेक तक्रारी करुनही गटविकास अधिकारी गैर कारभाराची चौकशी करीत नाहीत हे खरे आहे काय,
(४) असल्यास, गटविकास अधिकारी गैरकारभाराच्या तक्रारी येत असून देखील कोणतीच कार्यवाही करीत नसल्याबाबत कोणती कार्यवाही करणार आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायत सरळगांव येथील सरपंच व ग्रामसेवक यांच्या गैरकारभाराबाबत तक्रारी आहेत. तसेच ग्रामीण पुरवठाबाबत तक्रारी आहेत. तथापि, घरकुल, शौचालय, जन सुविधा योजनांतील गैरव्यवहार, आरोग्य, शाळांची दुरावस्था याबाबत तक्रारी नाहीत.

(२) नाही.

सरळगांव ग्रामपंचायत, तालुका मुरबाड येथील ग्रामपंचायतीच्या व्यापारी संकुलाच्या कामाबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) जिल्हा परिषद, ठाणे यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे.

(३) नाही.

गट विकास अधिकाऱ्यांनी सरळगांव ग्रामपंचायतीच्या गैरकारभाराबाबत चौकशी केली असता गैरकारभार झालेला नसल्याचे कळविले आहे. मात्र सदरबाबत जिल्हास्तरावरुन सखोल चौकशी सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील प्रकल्प ग्रस्तांना सोलापूर जिल्हयामध्ये पुनर्वसन केलेल्या वस्त्यांना महसूल गावचा दर्जा व स्वतंत्र ग्रामपंचायती देण्याबाबत

**(२०) २०३०९ (१७-०८-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रकल्प ग्रस्तांना सोलापूर जिल्हयामध्ये संपादित केलेल्या जमिनी देवून त्यांना राहण्यासाठी वसवलेल्या १६ गावांना महसूल गावाचा दर्जा मिळावा व त्या ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायतीची स्थापना करावी अशा मागण्यासाठी प्रकल्पग्रस्तांनी माहे एप्रिल-मे २०१५ वा त्यादरम्यान धरणे आंदोलन केले होते काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ,
(३) असल्यास, त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) महसूल विभागाच्या दिनांक ०६.११.१९८५ च्या शासन परिपत्रकानुसार ३०० च्या वर लोकसंख्या असलेल्या गावठाणांना स्वतंत्र महसुली गावांचा दर्जा देणेबाबत तसेच, दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ व दिनांक ०४ मार्च, २०१४ व्या शासन निर्णयातील निकषांनुसार महसुली गावांचा दर्जा प्राप्त झालेल्या गावठाणांमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या मजुरी दरात केलेली वाढ**

**(२१) २०३२१ (१४-०८-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजीपासून केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या मजुरीचे किमान वेतन दररोज रुपये १६८ वरुन रुपये १८१ केले आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाने आपल्या महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या दरात त्या प्रमाणात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, या दोन्हीही योजनेतील वेतनवाढीची अंमलबजावणी राज्यामध्ये केव्हापासून करण्यात आली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-१०-२०१५) :**(१) होय,

(२) जे दर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी लागू आहेत तेच दर महाराष्ट्र रोजगार हमी योजनेला सुध्दा लागू केले जातात.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यामध्ये प्रतिदिन रु.१८१/- या मजुरी दराची अंमलबजावणी राज्यामध्ये दिनांक ०१ एप्रिल, २०१५ पासून करण्यात येत आहे.

---

**सोलापूर जिल्ह्यामध्ये इंदिरा आवास योजनेखाली घरकुल बांधण्यासाठी लाभार्थ्याला रक्कम मिळण्याबाबत**

**(२२) २०३२२ (१४-०८-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यामध्ये इंदिरा आवास योजनेखाली सन २०१५-१६ मध्ये किती घरकुले बांधण्याचे उद्दिष्ठ ठरविण्यात आले आहे,

(२) असल्यास, घरकुल बांधण्यासाठी प्रत्येक घरकुलास केंद्र शासन, राज्य शासन यांच्याकडून लाभार्थ्याला किती रक्कम मिळणार आहे,

(३) असल्यास, या रक्कमे व्यतिरिक्त शौचालय बांधण्यासाठी द्रारिद्ररेषेच्या व दलित समाजाच्या कुटुंबासाठी १२ हजाराची वेगळी मदत मिळणार आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,ज्या लाभार्थ्याला स्वतःला मालकीची जागा नाही त्यांना घरकुल बांधण्यासाठी जागा घेण्यासाठी प्रत्येक ५० हजार रुपये मिळणार आहेत हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात इंदिरा आवास योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून १,८८,३१९ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले. यापैकी दि.१६.६.२०१५ च्या पत्रान्वये ७८२८६ घरकुलांचे उद्दिष्ट वाटप करण्यात आले आहे. यापैकी सोलापूर जिल्ह्यासाठी १६२९ घरकुलांचे उद्दिष्ट सद्यस्थितीत देण्यात आले आहे.
(२) सन २०१५-१६ पासून इंदिरा आवास योजनेचे केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण अंतरीमरित्या ५०:५० करण्यात आले आहे. तथापि, याबाबत अंतिम निर्णय केंद्र शासनाकडून प्रलंबित आहे. केंद्र शासनाचा अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर राज्य अतिरिक्त हिश्याबाबत निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे केंद्र व राज्य हिस्सा तसेच राज्य अतिरिक्त हिस्सा अद्याप निश्चित नाही. परंतु सन २०१४-१५ प्रमाणेच लाभार्थ्यांना रु.९५,०००/- प्रमाणे प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.
(३) होय.
(४) व (५) होय.
वित्त मंत्री यांनी अर्थसंकल्पीय भाषणात पंडीत दीनदयाळ उपाध्यय घरकुल जागा खरेदीसाठी अर्थसहाय योजना जाहीर केली आहे. सदर योजनेस मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यासाठी मंत्रिमंडळ प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर योजनेअंतगत घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या लाभार्थ्यांना स्वत:ची जागा खरेदी करण्यासाठी रु.५०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्याची बाब विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अचलपूर वि.स.मतदारसंघातील भारतीय स्टेट बँक चांदूरबाजार यांच्याकडून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळण्याबाबत**

**(२३) २०४३२ (१४-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर वि.स. मतदार संघातील भारतीय स्टेट बँक चांदूरबाजार यांचेकडून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मंजूर होत नसलेबाबत, त्यामुळे मतदार संघातील विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही.
भारतीय स्टेट बँकेकडून प्राप्त अहवालानुसार दिनांक २८.०९.२००४ ते ३०.०६.२०१५ या कालावधीत भारतीय स्टेट बँक, चांदूर बाजार शाखा यांचेमार्फत ९९ विद्यार्थ्यांना एकूण रु. २,०४,१६,०८४/- इतके शैक्षणिक कर्ज मंजूर करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पं.स.तर्फे देण्यात येणाऱ्या आवास योजनेचे लाभार्थी धनादेश ग्रा.पं.स्तरावर वितरीत करण्याच्या उपाययोजनांबाबत**

**(२४) २०४४७ (१७-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत समितीतर्फे देण्यात येणाऱ्या आवास योजनेचे धनादेश लाभार्थ्यांना ग्राम पंचायत स्तरावर वितरीत करण्याबाबत आमदार अचलपूर वि.स. यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी शासनास लेखी पत्राद्वारे सुचविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०९-२०१५)** :(१) होय.
सदर विषयाशी संबंधित मा.आमदार अचलपूर यांचे दिनांक २५.५.२०१५ रोजीचे पत्र कार्यासनात दिनांक १५.७.२०१५ रोजी प्राप्त झाले आहे.
(२) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सन २०१५-१६ पासून इंदिरा आवास योजनेचा निधी PFMD (Public Financial Management System) प्रणालीद्वारे राज्यस्तरावर उघडण्यात आलेल्या बँक खात्यातून लाभार्थ्यांच्या बँक / पोस्ट खात्यात थेट जमा करण्याचा निर्णय घेतला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी स्थापन झालेल्या विकास मंडळास मुदतवाढ मिळण्याबाबत**

**(२५) २०५१६ (१४-०८-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी १९९४ मध्ये स्थापन झालेली विकास मंडळास मुदतवाढ मिळाली, मात्र त्या प्रमाणात मंडळाच्या अधिकारात वाढ झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) विकास मंडळ स्थापन करण्याचा उद्देश साध्य झाला किंवा नाही याचे मुल्यमापन करण्यासाठी राज्य शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप कसे असेल ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-१०-२०१५) :**(१) , (२) व (३) राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरीता स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळांना स्थापनेपासून मा. राज्यपाल महोदयांनी वेळोवेळी मुदतवाढ दिलेली असून सद्यस्थितीत त्यांची मुदत ३० एप्रिल, २०२० पर्यंत आहे. मा. राज्यपाल हे तिन्ही विकास मंडळाचे घटनात्मक प्रमुख असून त्यांच्याकडून विकास मंडळांच्या कामकाजाच्या आढाव्याअंती कार्य निश्चित/सुधारित केली जातात.

---

**किन्हवली (जि. ठाणे) येथील चेरापोली, कळंभे, गोठेघर वाफे शहापूर ग्रामपंचायत हद्दीत बांधलेले अनधिकृत इमारतीचे बांधकाम**

**(२६) २०७५७ (१४-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किन्हवली (जि.ठाणे) येथील चेरापोली, कळंभे, गोठेघर वाफे शहापूर ग्रामपंचायत हद्दीत जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या नियमांचे उल्लंघन करुन बांधलेल्या अनधिकृत इमारत बांधकामाबाबत माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान तक्रार करुनही अद्याप कोणतीच कारवाई केली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) होय हे अंशत: खरे आहे.
(२) अशी बाब नाही.
(३) शहापूर तालुक्यातील ग्रामपंचायत किन्हवली, चेरपोली, कळंबे वाफे व शहापूर हद्दीतील अनधिकृत इमारत बांधकामाबाबत सरपंच / ग्रामसेवक यांना कार्यवाही करण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती शहापूर यांनी दिनांक १६.०५.२०१५ च्या पत्रानुसार कळविले असून चेरपोली, वाफे, किन्हवली कळंबे हद्दीमध्ये तक्रारअर्जानुसार अधनिकृत बांधकाम नसल्याचे ग्रामपंचायत अहवालानुसार दिसून येते आहे. तसेच ग्रामपंचायत गोठेघर हद्दीतील अंशत: अनधिकृत बांधकामाबाबत संबंधित बांधकाम धारकास ग्रामपंचायतीने दिनांक २५.०८.२०१५ नुसार नोटीस देण्यात आली आहे.
(४) अशी बाब नाही.

---

**खर्चावर नियंत्रण ठेवण्याबाबत करावयाच्या उपाययोजना**

**(२७) २०८९२ (१४-०८-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुमारे १३ हजार कोटीची तूट तसेच कर्जफेडीसाठी येणारा २६ हजार कोटींचा खर्च ही पार्श्वभूमी लक्षात घेता खर्चावर नियंत्रण ठेवण्याबरोबरच नविन कर्जाबाबत विचारविनिमय करुन निर्णय घ्यावा असे राज्याच्या वित्त आणि नियोजन विभागाने राज्य शासनाला माहे एप्रिल, २०१५ वा त्यादरम्यान सुचविले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खर्चावर नियंत्रण आणण्याकरिता राज्य शासनामार्फत कोणती पावले उचलण्यात येत आहे वा आली आहेत,

(३) तसेच यामुळे राज्यातील विकास कामांवर कोणता परिणाम होणार असून त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :**(१) या बाबींचा उहापोह मार्च, २०१५ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात विधानमंडळास सादर करण्यात आलेल्या राज्याच्या वित्तीय स्थिती विषयक श्वेतपत्रिकेमध्ये करण्यात आलेला आहे.

(२) खर्चावर नियंत्रण आणण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

अ) राज्याच्या वित्तीय स्थितीबाबत श्वेतपत्रिकेमध्ये मांडलेल्या मुद्दांवर कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

ब) दिनांक ०२.०६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये वेतनावरील खर्चाची वाढ मर्यादीत करण्यासाठी उपाययोजना निश्चित केली आहे.

क) उद्योगांसाठी वीजेवरील अनुदान कमी केले आहे.

ड) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सुसंगत अशी कार्यवाही करुन सर्व व्यक्तीगत लाभार्थी योजना आधारशी जोडून लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँकेतील खात्यात परस्पर जमा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात राबविण्यात येत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेबाबत**

**(२८) २०९१२ (१७-०८-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे (मनरेगा) राज्यातील गरीबी २००९-१० या काळात १४ टक्क्यांनी कमी होणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमुळे राज्यातील गरीबी १४ टक्क्यांनी कमी झाली आहे काय, असल्यास, ही योजना पूर्णपणे यशस्वी झाली आहे काय,
(३) राज्यात ही योजना पूर्णपणे यशस्वी झाली नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत व ही योजना पूर्णपणे यशस्वी होण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-१०-२०१५) :**(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

महात्मा गांधी राग्रारोहयोंतर्गत अकुशल काम करण्यस इच्छुक असणा-या प्रत्येक कुटूंबातील प्रौढ व्यक्तीस योजनेंतर्गत १०० दिवस प्रतिकुटूंब रोजगाराची हमी देण्यात आली सून, त्या माध्यमातून स्थायी स्वरुपाची मालमता निर्माण करणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे.

सदर योजना ही मागणी प्रवण असून, सन २००९-१० या वर्षात एकूण १९१.६६ लाख इतकी मनुष्य दिवस निमिती होउुन एकूण ३,३६८ एवढी कामे पूर्ण करयात आली. तसेच सदर वर्षात एकूण रु.२५३.५० कोटी इतका खर्च झाला.

योजनेच्या सुरुवातीपासून आतापर्यंतच्या कालावधीमध्ये एकूण ४,३८,४६२ इतकी कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

योजनेंतर्गत कार्यपध्दतीचे सुलभीकरण, नावीन्यपूर्ण कल्पक नियोजन व अंमलबजावणी केल्याने ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक जीवनमानात कायापालट होण्याकरिता ही योजना निश्चितच उपयुक्त ठरत आहे.

---

## नागपुर जिल्हयातंर्गत कोंढाळी दोडकी रस्ता दुरुस्तीमध्ये झालेला गैरप्रकार

**(२९) २११२२ (१४-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपुर जिल्हयातंर्गत कोंढाळी दोडकी रस्ता दुरुस्तीमध्ये गैरप्रकार झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे रस्ता दुरुस्तीमध्ये लागणारे साहित्य वापरले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,रस्ता दुरुस्ती साहित्यामध्ये तपासणीमध्ये शाखा अभियंता व उपविभागीय अभियंत्याचे अक्षम्य दुर्लक्ष झाले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रस्ता दुरुस्ती गैरप्रकारामध्ये विभागास तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाडा तालुक्यात (जि.पालघर) रासायनिक कारखान्यांची संख्या वाढत असल्यामुळे अनेक वेळा छोट्या-मोठ्या आगीच्या घटना घडत असल्याबाबत**

**(३०) २१३६५ (१२-०८-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यात (जि.पालघर) रासायनिक कारखान्यांची संख्या वाढत असल्यामुळे अनेक वेळा छोट्या-मोठ्या आगीच्या घटना घडत असल्यामुळे या परिसरात अन्य सुविधा व स्वतंत्र अग्निशमन दल उभारणीची मागणी स्थानिक पंचायत समिती सदस्यांकडून तसेच नागरिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ च्या अनुषंगाने या परिसरात वाढत्या आगीच्या घटना रोखण्यासाठी तात्काळ अग्निशमन दल उभारणीबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) व (२) होय. वाडा तालुक्याकरीता स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा नसल्याकारणाने पंचायत समिती वाडा यांनी वाडा तालुक्यासाठी अग्निशमन विभाग मंजूर व्हावे असा ठराव दि.६.६.२०१५ रोजीच्या मासिक सभेत ठराव क्रमांक २८ अन्वये सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे.
(३) व (४) राज्याच्या अग्निशमन सेवा सक्षमीरकणासाठी व बळकटीकरणासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान ही योजना राबविण्यात येत आहे. राज्यात राज्यस्तरीय अग्निशमन सेवा नसल्यामुळे ही सेवा नागरी स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्यामार्फत पुरविण्यात येते. सद्य:स्थितीत राज्यातील १३८ तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी नगरपालिका/नगरपंचायती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु असून यामध्ये वाडा तालुका मुख्यालय ग्रामपंचायतीचा समावेश आहे. याबाबत कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर राज्याच्या अग्निशमन सेवा सक्षमीकरणासाठी व बळकटीकरणासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान ही योजना या तालुक्यांना लागू करण्याचा विचार करण्यात येत आहे.

---

**महाराष्ट्र राज्य ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना सुविधा पुरविण्याबाबत**

**(३१) २१४९९ (१४-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या कामावर जाणा-या मजुरांसाठी पिण्याचे पाणी, प्रथमोपचार पेटी, विसाव्यासाठी मंडप व १ वर्षाखालील बालकांच्या दृष्टीने पाळण्याची सोय आदी सुविधा पुरविणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यात रोहयो अंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे होत असली तरी येथील मजुरांनी या सुविधा फक्त कागदोपत्री पुरविण्यात येतात. त्यामुळे रोजगार हमी योजनेच्या कामांची चौकशी करुन संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना प्रत्यक्षात सुविधा पुरविण्यासाठी काय कार्यवाही केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-१०-२०१५) :**(१) होय.

कामाच्या ठिकाणी मजूरांसाठी सुरक्षित पिण्याचे पाणी, विश्रांतीसाठी तात्पुरत्या निवाऱ्याची सोय, प्रथमोपचार पेटी इ.सुविधा पुरविणे कायद्याने बंधनकारक आहे.

(२) भंडारा जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजूरांसाठी आवश्यकतेनुसार सर्व सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(३) योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजूरांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निदेश क्षेत्रिय स्तरावर देण्यात आलेले आहेत. तसेच कामाची पाहणी करताना मजूरांना उपलब्ध करुन दिलेल्या सुविधाही तपासण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परळी ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर येथील प्रलंबित असलेल्या स्मशान शेड बांधकामाबाबत**

**(३२) २१८२९ (१४-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी ता.शाहुवाडी जिल्हा कोल्हापूर येथे स्मशान रोड इमारत मंजूर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रोड बांधण्यासाठी ग्रामपंचायतीकडे जागा उपलब्ध नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामपंचायतीने स्मशान शेडचे बांधकाम करण्यासाठी गावालगत असलेल्या गायरान मधील जागेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी कोल्हापूर यांचे स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देणार आहे काय,
(६) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर प्रस्ताव ग्रामपंचायत स्तरावर प्रलंबित आहे.
(५), (६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील लोकप्रतिनिधींनी "आमदार आदर्श ग्राम योजना" राबविण्याबाबत**

**(३३) २१८५५ (१७-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदार संघातील ३ ग्रामपंचायतींना आदर्श ग्राम करण्यासाठी "आमदार आदर्श ग्राम योजना" राबविली जाणार आहे, हे खरे आहे काय,
(२) सदरहू योजनेचे स्वरूप व उद्दिष्ट काय,
(३) सदरहू योजनेअंतर्गत कोणते उपक्रम राबविले जाणार आहेत,
(४) या योजनांच्या अंमलबजावणीसाठी कोणती उपाययोजना आखण्यात आली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) होय खरे आहे.
(२) व (३) सदरहू योजनेचे स्वरुप व उद्दिष्ट तसेच उपक्रमांसंदर्भात शा.नि.क्र.आग्रायो-२०१५/प्र.क्र.३६/योजना-५, दिनांक २० मे, २०१५ सोबात जोडण्यात येत आहे.
(४) राज्य स्तरावर या योजनेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, उमेद, यांची नोडल अधिकारी, म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत दिनांक १४ जुलै, २०१५ रोजी सर्व विधानसभा व विधानपरिषद सदस्यांना पहिली ग्रामपंचायत निवडण्याचे आवाहन केले आहे. तसेच दिनांक १७ जुलै, २०१५ व दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांनी या योजनेमध्ये गावाची निवड लवकरात लवकर होणेसाठी पाठपुरावा करणेबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

या योजनेसंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना लवकरच निर्गमित करण्यात येणार आहे.

---

**खाजगी संस्थांमध्ये १५ ते २० हजार रुपये पगाराच्या मर्यादेपुढे व्यवसाय कर कपात करण्याबाबत**

**(३४) २१८८१ (१७-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी संस्थांमध्ये ज्या मजुराचा ७५००/- रुपये मासिक पगार आहे त्याचे पगारातून रु.१५०/- व्यवसाय कर कपात केला जातो हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्याची महागाईची परिस्थिती पाहता खाजगी संस्थांमध्ये ज्यांच्या पगारांची मर्यादा १५ ते २० हजारांच्या पुढे आहे अशांच्या पगारातून व्यवसाय कर कपात करावा अशी अनेक वर्षापासून खाजगी संस्था धारकांची मागणी होत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५)** :(१) होय.

मासिक वेतन वा मजूरी रु. ७,५०१/ ते रु. १०,०००/- असलेल्या पुरुषांच्या वेतन वा मजूरी मधून कपात करण्यात येणाऱ्या व्यवसाय कराची रक्कम दरमहा रु.१५०/- नसून रु.१७५/- इतकी आहे. स्त्रियांच्या बाबत रु. १०,०००/- पर्यंत मासिक वेतन वा मजूरी असल्यास व्यवसाय कर लागत नाही.
(२) होय.

काही व्यक्ती तसेच काही औद्योगिक संस्थांकडून व्यवसाय कर माफीसाठी असलेली वेतन वा मजूरीची मर्यादा वाढविण्याची विनंती करण्यात आली आहे. परंतु सदर व्यक्ती वा संस्थाकडून मागणी करण्यात आलेली वेतन वा मजुरीची मर्यादा वेगवेगळी आहे.
(३) दि.१.७.२०१४ पूर्वी मासिक वेतन वा मजुरीची रक्कम रु.५,०००/- पर्यंत असलेल्या व्यक्तींना दि.१.७.२०१४ पासून सदर मर्यादा रु. ७,५००/- करण्यात आली.

तसेच दि.१.४.२०१५ पासून महिलांसाठी सदर मर्यादा रु.१०,०००/- करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौ.बारव्हा, ता.लाखांदूर, जि.भंडारा येथील एलईडी लाईट खरेदीच्या प्रकरणामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३५) २२०६७ (१७-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.बारव्हा, ता.लाखांदूर, जि.भंडारा येथील सरपंच/सचिवांनी एलईडी लाईट खरेदीचा प्रकरणामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार केलेला आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ग्रामपंचयातीचा सरपंच/सचिवांनी सन २०११-१२ मध्ये कोणत्याही प्रकारची जाहिरात व कोटेसन दस्ताऐवज न मागविता पुरवठाधारकांकडुन एलईडी लाईट कमी दराने खरेदी केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ग्रामपंचयातीच्या सरपंच/सचिवांनी साधीक एजेंसी पोहरा यांच्याकडून दि.०९.०७.२०१३ ला ९५००/- रु. प्रति नग प्रमाणे १५ एलईडी लाईट १४२५००/- रु.खरेदी केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या ग्रामपंचयातकडे सरपंच व सचिवांनी एलईडी लाईटचे कोटेशन कोणत्या तारखेला मंजुर केले याबाबतचे कुठलेही दस्ताऐवज उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या ग्रामपंचायतीच्या एलईडी लाईट प्रकरणामध्ये झालेल्या गैरव्यवहारांची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(६) तसेच ग्राम पंचायतीच्या दोषी अधिका-यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) होय.
(२) एलईडी लाईट खरेदी करण्याबाबत कोणतीही जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली नाही. परंतु निर्वाण इलेक्ट्रीकल लाखणी, नौकरकर हार्डवेअर ॲन्ड इलेक्ट्रीकल आसगाव व साधीक ऐजंसी पोहरा यांचे कोटेशन ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध असल्याचे दिसून आले. यामधील कमी दराने कोटेशन मंजूर करुन खरेदी केलेली आहे.
(३) होय.
(४) मासिक सभा दिनांक २२.०६.२०१३, ठराव क्रमांक ७ अन्वये कमी दराचे कोटेशन मंजूर करण्यात आले आहेत. परंतु सदर कोटेशन कोणत्या तारखेला प्राप्त झाले याबाबतचा कुठलाही दस्ताऐवज ग्रामपंचायत कार्यलयात उपलब्ध नाही.
(५) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले.
(६) सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधित सचिव यांना दिनांक २१.१.२१४ ला निलंबित करून त्यांचेवर विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. तसेच सरपंच यांचे विरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(१) सुनसार कार्यवाहीस्तव व्यक्तीश: चौकशी करुन अभिप्रायार्थ प्रकरण अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना दिनांक ०५.०२.२०१५ नुसार पाठविण्यातआले आहे.
(७) अशी बाब नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यात मनरेगामधील विविध कामांमध्ये झालेला कोट्यवधी रुपयांचा अपहार**

**(३६) २२५१० (१७-०८-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात मनरेगामधील विविध कामांमध्ये गेल्या तीन वर्षात कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील अहवालानुसार कोल्हापूर जिल्ह्यात मनरेगामधील विविध कामांमध्ये गेल्या ३ वर्षात कोटयावधी रुपयांना अपहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे नाही,

तथापि जिल्हाधिकारी कार्यालयातील तत्कालीन शाखा अभियंता यांनी नरेगाअंतर्गत मागील दोन वर्षामध्ये केलेल्या कामांच्या तपासणीअंती कामांमध्ये त्रुटी आढळून आल्या अशा कामांची चौकशी करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत कामांमध्ये अनियमितता असल्याचे दिसून आले. त्यानुषंगाने संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई विचाराधीन आहे.

---

## हिंगोली जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील बचत गटासाठी स्थायी स्वरुपात व्यापारी संकुल व सभागृह बांधण्याबाबत

**(३७) २२६४२ (१४-०८-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील बचत गटासाठी स्थायी स्वरुपात व्यापारी संकुल व सभागृह बांधण्यात यावे अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, व मा.ग्रामविकास मंत्री यांना माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी स्थायी स्वरुपात व्यापारी संकुल व सभागृहाचे बांधकाम निश्चित किती कालावधीत करण्यात येईल,

(३) तसेच सदर निवेदनावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) हिंगोली जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील बचत गटांसाठी स्थायी स्वरुपात व्यापारी संकुल व सभागृह बांधण्याच्या अनुषंगाने बाजारपेठेच्या ठिकाणी जागा उपलब्ध असल्याबाबत आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबात मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली यांना कळविण्यात आलेले आहे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भागात सिंचन विहीरी, पाणंद रस्ते गुरांचे गोठे इत्यादी कामे सुरु करण्याबाबत**

**(३८) २२६४९ (१७-०८-२०१५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील सन २०१४-१५ या वर्षात तीव्र दुष्काळी परिस्थिती असून ही हिंगोली, सेनगांव, कळमनुरी व औंढा (ना.) पंचायत समिती अंतर्गत सिंचन विहीरी, पाणंद रस्ते, शेतकऱ्यांचे शेतावरील गुरांचे गोठे इत्यादी ग्रामीण भागातील शेतक-यांचे उपयोगी कामे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत केल्या जात नसून संबंधित अधिकारी या कामाकडे हेतुपुरस्पर दुर्लक्ष करीत आहेत व त्यामुळे मजुरांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) जिल्ह्यातील ग्रामीण भागात सिंचन विहीरी, पाणंद रस्ते गुरांचे गोठे इत्यादी कामे सुरु करण्याबाबत शासनाकडून काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हिंगोली जिल्ह्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१४-१५ मध्ये १९२७ सिंचन विहिरींची कामे घेण्यात आली असून १०६२ सिंचन विहिरींची कामे पूर्ण करण्यात आली असून ९१५ विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत, हिंगोली, सेनगांव, कळमनुरी व औंढा (ना) पंचायत समिती अंतर्गत सन २०१४-१५ मध्ये ग्रामपंचायत व यंत्रणा मिळून पाणंद रस्त्याची ५६, गुरांचे गोठ्यांची २४ कामे होती घेण्यात आली आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर शेल्फवर कामे उपलब्ध असून मजूरांकडून नमुना क्रमांक ४ मध्ये कामाची मागणी प्राप्त होताच त्यांना तात्काळ कामे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील मौजे मोकली, ता धर्माबाद व कार्‍हाळ ता.बिलोली या गट ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याबाबत**

**(३९) २२६५७ (१४-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील मौजे मोकली ता.धर्माबाद व मौजे कार्‍हाळ ता.बिलोली या दोन तालुक्यामध्ये विभागलेल्या मोकली कार्‍हाळ या गट ग्रामपंचायतीचे विभाजन करुन कार्‍हाळ या महसूली गावास स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ मे, २०१५ रोजी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने नविन काऱ्हाळ ग्रामपंचायत निर्माण करण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयानुसार ज्या गावी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची आहे त्या गावाची लोकसंख्या २००० असणे आवश्यक आहे. आदिवासी किंवा तांडा या भागासाठी तसेच, दोन गावात तीन कि.मी. पेक्षा अधिक अंतर असल्यास अशा गावाची लोकसंख्या १००० असणे आवश्यक आहे. तसेच, दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पांमुळे पुनर्वसित झालेल्या ठिकाणी नविन ग्रामपंचायत स्थापन करावयाची असल्यास लोकसंख्या किमान ३५० ते १००० असणे आवश्यक आहे.

मौजे मोकली ता. धर्माबाद व मौजे काऱ्हाळ ता.बिलोली या दोन तालुक्यामध्ये विभागलेल्या मोकली कऱ्हाड या गट ग्रामपंचायतीचे विभाजन करुन काऱ्हाळया महसूली गावास स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देणेबाबत विहीत पध्दतीने शासनास प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना देण्यात आलेल्या आहेत.

---

**नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालूक्यातील पूलाच्या कामास निधी उपलब्धतेबाबत**

**(४०) २२६५८ (१४-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील प्रजिमा ५४-हनूमान हिपरगा-नरंगल-सावरगाव (थडी) उमरसांगवी ता.देगलूर या रस्त्यावरील पुलाच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्याविषयी मा.अधिक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, औरंगाबाद यांनी दिनांक ८ मे, २०१५ रोजी ग्रामविकास विभागाकडे मागणी करुन सुध्दा निधी अभावी सदर पूलाचे काम प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी उपलब्धतेविषयी काय कार्यवाही करण्यात आली आहे व निधी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच निधी उपलब्धता व पूलाच्या कामाच्या संदर्भात दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ही केंद्रीया योजना आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीच्या प्रमाणात तसेच संबंधित कामाच्या प्रगतीनुसार निधीचे वाटप करण्यात येते. त्यानुसार अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

यांनी त्यांच्या दि.८ मे, २०१५ च्या पत्रान्वये केलेल्या निधीच्या मागणीच्या अनुषंगाने प्रश्नांकित पुलाच्या कामास रु.९८ लक्ष निधी वितरीत केल असून प्रश्नांकित पुलाचे काम प्रगतीत आहे.

राज्यास केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कार्यक्रमाकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याकरीता वेळोवेळी प्रशासन व शासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौदा (जि.नागपूर) तालुक्यातील भेंडाळा ग्रामपंचायत प्रशासनाने मनरेगा अंतर्गत काम करणाऱ्या कामगारांना कामावरुन निलंबित केल्याबाबत**

**(४१) २२८२९ (१७-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौदा (जि.नागपूर) तालुक्यातील भेंडाळा ग्रामपंचायत प्रशासनाने मनरेगा अंतर्गत काम करणा-या सहा महिला आणि एक पुरुष अशा एकूण सात जणांना माहे मे, २०१५ वा त्यासुमारास कामावरुन निलंबित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात कामगारांनी आंदोलन केले होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामगारांना कामावरुन निलंबित करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या कामगारांना परत कामावर घेण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-१०-२०१५) :**(१) व (२) मौदा (जि.नागपूर) तालुक्यातील भेंडाळा ग्रामपंचायत प्रशासनाने मनरेगा अंतर्गत कामे करणा-या सहा महिला आणि एक पुरुष अशा एकूण सात जणांना माहे मे, २०१५ वा त्यासुमारास कामावरुन निलंबित केलेले नाही. सदर मजूरांना पांधण रस्ता व अन्य कामे देण्यात आली होती. तथापि सदर मजूर कामावर न आल्याने नविन ६ मजूरांना काम देण्यात आले. नविन ६ मजूर कामावर हजर झाल्यावर अगोदरच्या मजुरांनी ग्रामपंचायतीकडे कामाची मागणी न करता पंचायत समिती कार्यालयासमोर नविन ६ मजूरांना कमी करुन फक्त आम्हाला काम देण्यात यासाठी आंदोलन केले हे खरे आहे.

(३) कामगारांना कामावरुन निलंबित करण्यात आलेले नाही.

(४) जून २०१५ पसून उपरोक्त ७ मजूर कामावर आले नाही. त्यांना वारंवार तोंडी बोलावणे करुनसुध्दा ते कामावर आले नाही. दरम्यान इतर ६ मजूरांची कामाची मागणी ग्रामपंचायतीला प्राप्त झाल्याने त्या मजूरांना काम देण्यात आलेले आहे. नवीन ६ मजूर कामावर आल्यावर अगोदरच्या मजूरांनी ग्रामपंचायतीला कामाची मागणी न करता पंचायतसमिती कार्यालयासमोर उपाषणाला बसले. पंचायत समितीच्यावतीने त्यांना काम उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगण्यात आले. तथपि या मजुरांनी नविन ६ मजूरांना कमी करुन फक्त आम्हाला काम

देण्यात यावे असा आग्रह धरला. तथापि कामाची मगणी असलेल्या अन्य मजूरांनाही काम देणे आवश्यक असल्याने ग्रामपंचायतीने वृक्ष लागवड कामासाठी १२ मजूरांचे प्रत्येकी ६-६ असे दोन गट पाडुन मासिक चक्राकार पध्दतीने काम देण्याचे ठरले त्यानुसार त्यांना व नविन घेतलेल्या ६ मजूरांना काम देण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हापरिषद बांधकाम विभागाने प्रस्तावित १९६ कामाकरिता शासनाने मंजूर केलेला ३२ कोटींचा निधी वापराविना पडून असल्याबाबत**

**(४२) २२८३२ (१७-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हापरिषद बांधकाम विभागाने प्रस्तावित १९६ रस्त्यांच्या कामाकरिता शासनाने ३२ कोटींचा निधी दिनांक ३१ मार्च पर्यंत न वापरल्याने तो निधी परत केला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा निधीचा वापर विहित वेळेत न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यामुळे अतिवृष्टीत बाधित रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत आहेत हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, यांस जबाबदार असणा-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच सदरच्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) सन २०१३-१४ मध्ये बांधकाम विभाग, जिल्हा परिषद नागपूर कडे रु.३२४४.२९ लक्ष रक्कमेची पुरहानी कार्यक्रमांतर्गत एकूण १९७ कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. जिल्हा परिषदेस मार्च २०१४ ला अनुदान प्राप्त झाल्याने एक वर्षाच्या कालावधीत जिल्हा परिषदेला हीकामे पूर्ण करण्याची होती. दरम्यान जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती मार्फत कामांना प्राधान्य क्रम ठरविणे, कामांना प्रशासकीय मंजूरी, तांत्रिक मान्यता, कामांची निविदा प्रक्रिया करणे इ. कामे करण्यात आली. तसेच सन २०१४-१५ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणूकीची आदर्श आचार संहिता लागू झाल्याने यामध्ये ३ ते ४ महिन्याचा कालावधी व्यतित झाला. मार्च २०१५ अखेर १७५ कामे पूर्ण करण्यात आलेली असून उर्वरित २२ कामे प्रगतीत तसेच पुर्णत्वास आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) १७५ कामे पूर्ण करण्यात आलेली असून उर्वरित २२ कामे प्रगतीत तसेच पुर्णत्वास आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमधील मेटल उद्योजकाकडे व व्यापा-यांकडे असलेल्या विक्रीकरांच्या थकबाकीबाबत**

**(४३) २२९२१ (१४-०८-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील मेटल उद्योजकाकडे व व्यापा-यांकडे विक्रीकरांची १० कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची थकबाकी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१५) :**(१) मुंबईतील मेटल उद्योजकांकडे व व्यापाऱ्यांकडे विक्रीकराची थकबाकी प्रलंबित आहे.
(२) सदर थकबाकी वसूल करण्यासाठी विक्रीकर विभागाकडून आदेश पारित करण्यात आलेले आहेत व त्या आदेशाच्या विरोधात बहुतंशः व्यापा-यांनी अपिल दाखल केले आहे. ज्या व्यापाऱ्यांनी अपिल दाखल केलेले नाही त्या व्यापा-यांविरुध्द वसूलीची कारवाई करण्यात येत आहे.
(३) लागू नाही.

---

**जळगाव जिल्हयात शासनाच्या ग्रामविकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येत असलेल्या सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षणात असलेल्या त्रुटी**

**(४४) २३००२ (१४-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात शासनाच्या ग्रामविकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येत असलेल्या सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षणात त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वेक्षणाच्या यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्यात अनेक कुटुंबाची नावे वगळली गेली तसेच हजारो कुटुंबातील काही व्यक्तींना वगळले गेले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दुरुस्तीबाबत संकेतस्थळावरील प्रती घेऊनही संबंधिताकडून विशिष्ट अर्जाची मागणी करण्यात आली हे खरे आहे काय,
(४) असल्यास, हया दुरुस्त्या विनाविलंब करण्यासाठी काय उपाययोजना करणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) नाही.
(२) सर्वेक्षणांतर्गत प्राप्त झालेल्या माहितीनुसार प्रारुप यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. यानंतर दावे व आक्षेप प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सदर दावे व आक्षेप प्रक्रियेद्वारे प्रारुप यादीमध्ये नाव नसल्यास स्वत:च्या माहितीमध्ये बदल करावयाचा असल्यास किंवाइतर कुटुंबानी दिलेल्या माहितीविषयी काही आक्षेप असल्यास दावे व आक्षेप दाखल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. याकरीता विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(३) व (४) सदर आक्षेप अपिलीय अधिकाऱ्यांकडून निराकरण करण्यात आले असून या अर्जाची नोंदणी संगणक प्रणालीमध्ये करण्याचे काम बेल कंपनीकडून सुरु आहे.

---

**रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील भंडारबोडी ग्रामपंचायतीच्या सरपंचाने केलेला गैरकारभार**

**(४५) २३०९३ (१७-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील भंडारबोडी ग्रामपंचायतीच्या सरपंच मिसार यांच्या गैरकाराभाराविषयी ग्रामपंचायचे सदस्य यांनी दिनांक १३ मार्च, २०१५ रोजीच्या सुमारास मुंबई अधिनियम १९५८ चे कलम ३९(१) नुसार अप्पर आयुक्तांकडे तक्रार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारानुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) चौकशीनुसार सरपंचावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) होय.
(२) होय. चौकशीनुसार सौ.वंदना नरेश मिसार, सरपंच, ग्रामपंचायत भंडाराबेडी, ता.रामटेक, जि.नागपूर ह्या दोषी आढळून आल्या असून त्यांच्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ (१) नुसार कार्यवाहीस पात्र ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) त्यानुसार सरपंचावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ (१) नुसार पुढील कार्यवाहीस्तव उपायुक्त (पुनर्वसन), नागपूर विभाग नागपूर यांचेकडे पत्र दिनांक २७.०७.२०१५ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
(४) अशी बाब नाही.

---

**वस्त्रोगातील कापड प्रक्रिया उद्योगाला करमुक्त करण्याबाबत**

**(४६) २३२४६ (१७-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वस्त्रोगातील कापड प्रक्रिया उद्योगाला दिनांक ८ मे, २०११ ते दिनांक ३० एप्रिल, २०१२ या काळात लागू झालेल्या व्हॅट रद्द करण्याची मागणी विधानसभा सदस्य इचलकरंजी यांच्यासह कापड प्रक्रिया उद्योगातील शिष्टमंडळाने मा.मंत्री वित्त यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पादरम्यान संपुर्ण वस्त्रोद्योग करमुक्त करण्याची घोषणा तत्कालीन अर्थमंत्री यांनी केली होती हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उद्योगाला व्हॅट रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५)** :(१) होय.
(२) सन २०१२-१३ अर्थसंकल्पादरम्यान फक्त कापड प्रक्रिया उद्योगाला कापड प्रक्रिया वरील करातून सुट देण्याचे घोषित केले होते.
(३) वरील घोषणेप्रमाणे दिनांक १ मे, २०१२ पासून कापड प्रक्रिया उद्योगाला मूल्यवर्धित करातून माफी देण्यात आलेली आहे.
(४) लागू नाही.

---

**मुंबई येथे बेकायदेशीरपणे चालणाऱ्या विविध लॉटरी संदर्भात कठोर कारवाई करण्याबाबत**

**(४७) २३३६३ (१४-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बेकायदेशीरपणे दररोज सायंकाळी मुंबई येथे चालणाऱ्या विविध लॉटरी संदर्भात कठोर कारवाई करण्याबाबतची मागणी लॉटरी विक्रेता संघातर्फे मा.मुख्यमंत्री (गृह), मा.मंत्री (वित्त), मा.राज्यमंत्री (गृह), मा.राज्यमंत्री (वित्त), अतिरिक्त मुख्य सचिव (गृह), अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) तसेच संबंधित परिक्षेत्राचे पोलीस उपायुक्त यांच्याकडे दिनांक २३ मे, २०१५ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली व येत आहे,
(३) असल्यास,सदरचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येईल वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०९-२०१५)** :(१) लॉटरी विक्रेता संघाचे दि. २३ मे, २०१५ रोजीचे लेखी निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(२), (३) व (४) तथापि, अनधिकृत चालणाऱ्या लॉटरीच्या धंद्यावर कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी या विभागाकडून गृह विभागास कळविण्यात येते.

पोलीस विभागाकडून अनधिकृत लॉटरीबाबत कारवाई करण्यात येत आहे.

सन २०१३ मध्ये अनधिकृत लॉटरीबाबत ३६ गुन्हे दाखल करुन २११ आरोपीतांना अटक करण्यात आली आणि रु.१,८१,८२,३८०/- किंमतीची २,९९,४८३ तिकिटे जप्त करण्यात आली . सन २०१४ मधे अनधिकृत लॉटरीबाबत ११४ गुन्हे दाखल करुन २९० आरोपितांना अटक करण्यात आली आणि रु.५,२५,५९,८८०/- किंमतीची ९,७२,७३६ तिकिटे जप्त करण्या आली. तसेच सन २०१५ मध्ये अनधिृकत लॉटरीबाबत २५ गुन्हे दाखल करुन ५५ आरोपितांना अटक करण्यात आली आणि रु.१,१३,८५,६७५/- किंमतीची २,७१,९२१ तिकिटे जप्त करण्यात आली.

सदर आरोपितांविरुध्द न्यायालयात खटले दाखल केले आहेत व अशी कार्यवाही पुढेही चालू राहणार आहे.

---

**पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरु असलेल्या नांदेपेरा ते शेलु (ता.वाणी, जि.यवतमाळ) रस्त्यावरील वाघाड्या पुलाचे झालेले निकृष्ठ दर्जाचे बांधकाम**

**(४८) २३४४२ (१४-०४-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरु असलेल्या नांदेपेरा ते शेलु (ता.वाणी, जि.यवतमाळ) रस्त्यावरील वाघाड्या पुलाचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे होत आहे काय,

(२) याआधी पुरामुळे दोनदा पूल वाहून गेला असून तेथीलच मातीमिश्रीत वाळूचा सर्रासपणे वापर होत आहे, ह खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, दोषींवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१५) :**(१) नाही.

(२) पूलाच्या बांधकामाकरीता कुठलीही मातीमिश्रीत वाळू वापरण्यात आलेली नाही. पूलाचे काम सूरु असतांना पूर आल्यामुळे सदर कामाकरीता काढण्यात आलेला वळण रस्ता २ वेळा क्षतीग्रस्त झाल्यामुळे तो तेव्हाच दुरुस्त करण्यात आलेला होता व वाहतूक सुरळीत करण्यात आलेली होती.

(३) सदरहू पुलाच्या बांधकामाच्या गुणवत्तेची राज्य गुणवत्ता नियंत्रक व केंद्रीय गुणवत्ता नियंत्रक यांनी तपासणी केलीली असून, त्यांनी कामाच्या गुणवत्तेबाबत समाधानकारक शेरे नोंदविलेले आहेत. तसेच कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी दि.२२/५/२०१५ रोजी या पुलाची संयुक्तरित पाहणी केलेली असून, पूल भौतिक दृष्ट्या पुर्ण झालेला आहे व पूलावरील वाहतूक सुरळीत चालू आहे

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खालापूर (ता.जि.रायगड) येथील निघडोली आणि पौदगावांना जोडणारा पातळगंगा नदीवरील पुलाचे काम निधी अभावी अपूर्ण असल्याबाबत**

**(४९) २३६३१ (१९-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (ता.जि.रायगड) निघडोली आणि पौदगावाना जोडणाऱ्या पातळगंगा नदीवरील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंर्तगत मंजूर करण्यात आलेल्या नविन पुलाचे काम निधी अभावी सुरु होवू शकले नसल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाला एक कोटी ३ लाख रुपयाचा निधी मंजूर झाला असून काम पूर्ण करण्याचा कालावधी माहे मे, २०१५ रोजी संपुष्टात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पुलाचे काम प्रलंबित असल्यामुळे त्या परिसरातील ग्रामस्थ, विद्यार्थी व कामगारांना दरवर्षी पावसाळयात धोकादायक फरशी पुलाचा वापर करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) होय, अंशत: खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सद्यस्थितीत हलक्या वाहनांसाठी धोकादायक नसलेल्या आर.सी.सी. बुडीत पुलावरुन वाहतुक सुरळीत चालू आहे.

राज्यास आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनास राज्यशासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांसोबतच्या प्रादेशिक आढावा बैठकांमध्येही राज्यास पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. राज्याची निधीची मागणी मांडण्याकरिता मा.मंत्री (ग्राम विकास) महोदया मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यानी दिनांक १ जून, २०१५ राजी मा.केंद्रीय वित्त मंत्री व केंद्रीय गाम विकास मंत्री यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली आहे. त्याचप्रमाणे मा.मुख्यमंत्री यांनी त्यांच्या दि.१ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये मा.प्रधानमंत्री व मा.केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री यांना निधी वितरीत करणेबाबत विनंती केली आहे.

---

### पुणे जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांने केलेला गैरव्यवहार

**(५०) २३६९३ (१४-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेने वैयक्तिक शौचालयाला अनुदान देण्यासाठी कोणताही प्रस्ताव नसताना पंचायत समित्यांना आगाऊ पैसे दिल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४४ ग्रामपंचायतींना सुमारे पावणे कोटी रुपयांचा हिशेब देता आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ग्रामसेवकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-१०-२०१५) :**(१) खरे नाही. वैयक्तिक शौचालयाच्या अनुदानाचे प्रस्ताव जिल्हा परिषदेला सादर होत नाहीत. वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामानंतर, अनुदान मागणीचा प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत पंचायत समितीला सादर केला जातो. पंचायत समिती त्याप्रमाणे अनुदानाची मागणी जिल्हा परिषदेकडे करते.

(२) व (३) पुणे जिल्हा परिषदेतील इंदापूर तालुक्यात जानेवारी ते मार्च २०१५ दरम्यान सर्व ग्रामपंचायतीमधील सन २००२ ते २०१४ मधील वैयक्तिक शौचालय लाभार्थी याद्या तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले होते. त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने खर्चाचा तपशील पंचायत स्तरावर सादर करणे आवश्यक होते. तथापि, इंदापूर तालुक्यातील ११४ ग्राम पंचायती पैकी ७ ग्रामपंचायतींनी सदर तपशील सादर केला नसून त्याची एकूण रक्कम रु.६,०९,२००/- इतकी आहे. ही रक्कम ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडून वसूल करण्याचे आदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.